INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625
ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**January-2020 Special Issue – 213**

## जागतिकीकरणाचा भाषा व साहित्यावरील प्रभाव
## वैश्वीकरण का हिंदी भाषा और साहित्यपर प्रभाव
## Impact of Globalization on Language & Literature



**अतिथी संपादक :**
डॉ. बाबासाहेब देशमुख
प्राचार्य,
अॅड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजूर
ता. अकोले, जि. अहमदनगर

**कार्यकारी संपादक :**
डॉ. द. के. गंधारे

**संपादन सहाय्य :**
डॉ. बी. टी. शेणकर
प्रा. बी. आर. होले
डॉ.आर.डी.ननावरे
प्रा.बी.के.थोरात
प्रा.ए.डी.सातपुते
प्रा.बी.एस. कुसमुडे

**मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर**

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | डॉ. भास्कर शेळके | 07 |
| 2 | जागतिकीकरण आणि कोकणातील कुणबी आणि कोळी बोली भाषा | डॉ. अनिल उबाळे | 11 |
| 3 | जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव | डॉ. द. के. गंधारे | 16 |
| 4 | 'राब' कथासंग्रहातील 'आवणी'कथेतून दिसणारा जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा.यशवंत भांडकोळी | 20 |
| 5 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | कु. स्वयंपूर्णा गायकवाड | 24 |
| 6 | जागतिकीकरणाचे स्त्रीवादी साहित्यावर झालेले परिणाम | प्रा. राजू शनवार | 27 |
| 7 | जागतिकीकरणाचा प्रमाण भाषा व बोली व भाषेवरील प्रभाव | सचिन कोतकर व डॉ. संजय नगरकर | 30 |
| 8 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | डॉ. रंजना कदम | 34 |
| 9 | जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील आदिवासींच्या संस्कृतीवर झालेला परिणाम | प्रा. राधाकिसन मुठे | 40 |
| 10 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | मंगेश जोर्वेकर | 44 |
| 11 | जागतिकीकरण : मराठी भाषा आणि संस्कृती | प्रा. मल्हारी पवार | 48 |
| 12 | मराठी कवितेतून घडणारे जागतिकीकरणाचे दर्शन | प्रा. लक्ष्मण कोठावळे | 53 |
| 13 | जागतिकीकरण आणि लोकसाहित्य | डॉ. वर्षा कीर्तने | 58 |
| 14 | जागतिकीकरणाचा कीर्तनसंस्थेवर पडलेला प्रभाव | डॉ. दत्तात्रय डुंबरे व डॉ. सर्जेराव जिगे | 63 |
| 15 | जागतिकीकरण आणि अनुवाद कौशल्य | डॉ. रावसाहेब ननावरे | 70 |
| 16 | जागतिकीकरण व प्रादेशिक साहित्य | डॉ. सुवर्णा जाधव | 74 |
| 17 | जागतिकीकरण व नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी | डॉ. योगिता रांधावणे | 77 |
| 18 | जागतिकीकरण आणि मराठी बोलीभाषा | डॉ. कुंडलिक पारधी | 79 |
| 19 | जागतिकीकरण आणि लोकसाहित्य | डॉ. निवृत्ती मिसाळ | 83 |
| 20 | आदिवासी कवितेत जागतिकीकरणाचे चित्रण | प्रा.चिंतामण धिंदळे व डॉ. तुकाराम रोंगटे | 85 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ. अशोक भवर | 92 |
| 22 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | शुभांगी बारवकर | 97 |
| 23 | जागतिकीकरण आणि मराठी कथा | प्रा. श्रीकांत आल्हाट | 100 |
| 24 | जागतिकीकरण व नव्वदोत्तर ग्रामीण कथा | विकास मांडवडे | 104 |
| 25 | जागतिकीकरणाचा 'वावटळ' ग्रामीण कवितासंग्रहावरील प्रभाव | डॉ. के. आर. पिसाळ | 108 |
| 26 | जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. अनिल गर्जे | 112 |
| 27 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | डॉ. कल्पना गावडे | 117 |
| 28 | जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव | श्री. निलेश वाकचौरे व डॉ. रावसाहेब ननावरे | 122 |
| 29 | जागतिकीकरण आणि मराठी कथा | डॉ. जी. के. वडितके | 126 |
| 30 | जागतिकीकरण मराठी भाषा व साहित्य | श्रीमती सारिका कर्पे | 129 |
| 31 | जागतिकीकरण आणि लोकसाहित्य | डॉ. एम. एम. बागुल | 133 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य यांचा बोलीभाषेवरील प्रभाव | अजितकुमार पाटील | 140 |
| 33 | जागतिकीकरण आणि 'लॅन्डमाफिया' आणि 'सत्याग्रह या कादंबऱ्या | मनीषा सुपेकर व डॉ. रावसाहेब ननावरे | 146 |
| 34 | जागतिकीकरणाचा प्रमाण व बोली भाषेवरील प्रभाव | डॉ. सुनील घनकुटे | 150 |





Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 213 : Impact of Globalization on Language & Literature
Peer Reviewed Journal | January-202

# जागतिकीकरणाचा प्रमाण भाषा व बोली भाषेवरील प्रभाव

सचिन माधवराव कोतकर
संशोधक विद्यार्थी, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर

प्रा.डॉ.संजय नगरकर
मराठी विभाग प्रमुख,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे

**जागतिकीकरणाचे स्वरूप :**

जागतिकीकरणाला खऱ्या अर्थाने सुरूवात स्वातंत्र्यपूर्व कालखंडातच झालेली दिसून येते. असे असले तरीही साधारणतः नव्वदच्या दशकापासून जागतिकीकरणाचे वारे खऱ्या अर्थाने आपल्याकडे वाहू लागल्याचे दिसून येतात. जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य या लेखात डॉ.प्रभा गणोरकरांनी जागतिकीकरणाची पुढील व्याख्या दिलेली आहे. ''उत्पादन, उपभोग, वस्तूंचा व्यापार, आंतरराष्ट्रीय राजकारण, अर्थनीतीचा पाया असलेली मालमत्ता यांच्या बदलत्या स्वरूपामधून उदय पावलेल्या आर्थिक, सामाजिक, तंत्रज्ञानात्मक, राजकीय आणि सांस्कृतिक संरचना प्रक्रियांचा संच म्हणजे जागतिकीकरण''[१] डॉ.प्रभा गणोरकरांनी जागतिकीकरणाची जी व्याख्या सागितली आहे त्यातून एक बाब अधोरेखीत होते ती म्हणजे, जागतिकीकरणात वस्तू ,सेवा, भांडवल राष्ट्रांच्या सीमा ओलांडून संपूर्ण जगभर पसरलेल्या दिसतात; परंतु तंत्रज्ञान मात्र विकसित देशांनी आपल्या पुरतेच सीमीत ठेवलेले दिसून येते. जागतिकीकरणात मानवी कल्याणापेक्षा पैसा कमविण्याचा उद्देशच दिसून येतो. हा एक प्रकारचा नवा साम्राज्यवादच आहे.देशाची आर्थिक प्रगती साध्य करण्यासाठी अनेकदा देशाला जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडून कर्ज घ्यावे लागते. हे कर्ज देत असताना त्यांच्याकडून अनेकदा जाचक स्वरूपाच्या अटी घातल्या जातात त्यामुळे विकसनशील देशांना आपली राष्ट्रीय धोरणे त्यानुसार बदलावी लागतात.त्यांनी घातलेल्या अटी सार्वभौम देशातील सरकारांना मान्य करण्यावाचून कोणताही पर्याय नसतो रशियाचे विघटन झाल्यापासून आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचा दबदबा वाढत चालेला आहे.एकप्रकारे अमेरिका जगातील देशांवर वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. अफगाणिस्तान असो अथवा इराक या देशांमध्ये अमेरिकेने ज्या पध्दतीने सैन्य घूसविले त्यातून त्यांची सत्ताकांक्षा दिसून येते.

जागतिकीकरणाचा खरा उद्देश मुळात सर्व मानवांची सांस्कृतिक प्रगती साध्य करणे हा आहे. पिळवणूक, गुलामगीरी, निरक्षरता, अनारोग्य यापासून सर्वांची मुक्तता व्हावी ही जागतिकीकरणा मागील खरी कल्पना आहे परंतु जागतिकीरणाच्या मुळ हेतू प्रमाणे जगभरातील देशांची वाटचाल होताना दिसून येत नाही. पाश्चात्य देशात जे चांगले मानले जाते ते सर्व देशात मानले जावे याप्रमाणे प्रत्येकजण अनुकरण करताना दिसतो. भारतीय संस्कृतीत वैश्विक कल्याण साधणारी जी मूल्ये होती ती आज जागतिकीकरणाच्या रेट्यात जूनाट आणि टाकाऊ वाटत आहेत. आज सर्वच स्तरात जागतिकीकरणाचा प्रभाव जाणवू लागला आहे. खाद्यपदार्थ, फर्निचर, शयनगृहे, हॉटेल, मॉल, वाहने इ. सर्वच बाबतीत जागतिकीकरण दिसून येते.नव्या पीढीच्या आवडी निवडी देखील बदलू लागल्या आहेत. मोबाईल इंटरनेटमुळे तर जगातील कोणत्याही देशातील व्यक्तीशी तात्काळ संपर्क प्रस्थापित केला जाऊ शकतो. विशेषतः प्रसारमाध्यमात झालेल्या आमुलाग्र बदलामुळे तर जग एव जवळ आले आहे की, ते एखाद्या छोट्या खेड्याप्रमाणे भासू लागले आहे. जागतिकीकरणामुळे सांस्कृति आदर्शच बदलत असल्याचे दिसून येत आहे. जागतिकीकरणामुळे संपूर्ण जगच एक बाजारपेठ बनू पाहत आ त्यातूनच संपूर्ण मानवाला आणि निसर्गाला हानी पोहचविणारे प्रकल्प स्थापीत झालेले दिसतात. खनिज ते

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 213 : Impact of Globalization on Language & Literature
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

बोलायला मात्र संकोच वाटतो. एकंदरीतच जागतिकीकरणाच्या रेट्यात अविकसीत, विकसनशील देशातील संस्कृती, भाषा यांचे मोठ्या प्रमाणात सपाटीकरण होत आहे.

जागतिकीकरणाचा आपल्या भाषेवर, संस्कृतीवर कसा विपरीत परिणाम झाला याविषयी फक्त नकारात्मक सूर आळवून काहीच साध्य होणार नाही. या जागतिकीकरणात जर टिकून राहायचे असेल तर सामुहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्याला करून घेता आला पाहिजे. एकेकाळी संगणकावर मराठी टाईप करणे म्हणजे अत्यंत जिकारीचे काम होते. ज्याला टाईपींगचे ज्ञान अवगत होते तोच संगणकावर मराठी लिहू शकत होता. आज मात्र युनिकोड फॉण्टच्या सहाय्याने कोणीही सहजपणे लिहू शकतो. याठिकाणी एवढेच म्हणायचे आहे की, इंटरनेटच्या आधारे आपण आपले लेखन जागतिक स्तरावर निश्चितच पोहचवू शकतो. आज वेबसाईटच्या मदतीने लहानातला लहान लेखक सुध्दा आपले विचार जागतीक स्तरावर मांडू शकतो. मराठी भाषेला वैचारिकतेचा खूप मोठा वारसा लाभलेला आहे; परंतु अलिकडच्या काळात जागतिक स्तरावर मात्र मराठी लेखकांचे वैचारिक लेखन दखलपात्र ठरताना कोठेच दिसत नाही.दुसऱ्या बाजूला मात्र अनेक परकीय लेखकांचे अनुवादीत वैचारिक पुस्तके मात्र मराठी भाषिक लोक आवर्जून वाचताना दिसतात. ही बाब निश्चितच चिंतनीय आहे. जागतिकीकरणापासून कोणतीही भाषा, संस्कृती, साहित्य अलिप्त राहू शकत नाही. हे वास्तव स्वीकारून आपण जागतिकीकरणाला सामोरे जाण्यासाठी आपला भाषाभिमान,स्वसंस्कृतीभिमान टिकवून ठेवला पाहिजेत. जागतिकीकरणाच्या रेट्यात मराठी भाषिकांनी मराठी भाषा कशी समृध्द होईल हे आव्हान समजून घेऊन प्रत्येकाने कार्यप्रवृत्त होणे गरजेचे आहे.

संदर्भग्रंथ :–

१. डॉ.प्रभा गणोरकर,'जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य', समा.'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य',संपा.डॉ.शरद गायकवाड, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १७ ऑक्टोबर २००९ पृ. १२४
२. डॉ.संजय लोहकरे,'प्रादेशिक बोलींचे भाषाविज्ञान',प्रशांत पब्लिकेशन्स,जळगाव,प्रथम आवृत्ती जानेवारी २०१९,पृ.७



Scanned by CamScanner